## प्रेसनोट

### प्रेम संबंध व अनैतिक संबंधातुन माळरानांत प्रियेसीचा खुन करुन मयत बॉडी पेट्रोलने जाळुन पुरावा नष्ट करणा-या नराधमांस युनिट-५ गुन्हे शाखेने केले जेरबंद.

दि. ११/०५/२०१८ रोजी सकाळी ८.३० वा.सुमांरास एका अनोळखी महिलेचा अर्धवट जळालेले अवस्थेतील मृतदेह स.नं.१०९ पाटील वस्ती येथील शेतात लोहगांव पुणे येथे मिळून आला होता.तिचे उजव्या हातावर इंग्रजीत A.B. व Aayodya असे गोंदण असलेली आढळून आलेने सदरबाबत विमानतळ पोलीस स्टे.गुन्हा रजि.नं.१४७/२०१८ भा.दं.वि.कलम-३०२,२०१ अन्वये गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट-५ पुणे शहर कडील मा.प्रभारी अधिकारी श्री.दत्ता चव्हाण, यांचे दिमतीत युनिटकडील सपो.निरी.युवराज नांद्रे,पो.हवा.संतोष मोहिते,राजेश रणसिंग, पो.ना.महेश वाघमारे,गणेश बाजारे,अंकुश जोगदंडे असे पोलीस स्टाफ करीत असताना तांत्रिक माध्यम व सोशल मिडियांचे माध्यमांचा आधार घेवून उजवे हातावर इंग्रजीत Aayodya असे गोंदलेले असलेचे आयोध्या वैद्य असे नाव असलेले एका महिलेचा फोटो आढळून आला त्यामध्ये तिचे व तिचेही हातात कडे व काळी माळ,पायांत पैजंण हे वरील गुन्हयांतील मयताशी संबंधी सर्व मिळते जुळते असे आढळून आलेने प्रथमतः ही तिच महिला असावी याबाबत खात्री झालेने तिचे नक्की ठाव ठिकाण्यांबाबत तिचे उपलब्ध झालेले नाव व तिचे उजवे हातावरील इंग्रजीतील Aayodya या गोंदणावरुन बातमीदारांमार्फत व तिला ओळखणारे व्यक्तीचा शोध घेवून आयोध्या वैद्य हिचे जवळचे मैत्रीणीचा शोध घेवून तिचेकडून सदर मयत महिलेचे नांव- अयोध्या सुदाम वैद्य वय-२५ वर्षे धंदा-नोकरी सध्या रा.शिवशंकर कॉलनी,गल्ली नं.३,बेडसे चाळ,चक्रपाणी वसाहत,भोसरी पुणे व मुळगाव जुने हत्तेश्वर मंदिर मु.पो.हातगाव जि.अहमदनगर असे असलेचे व ती सध्या तिचेकडेच रहावयांस असून दि.१०/०५/२०१८ रोजी सायं.५.३० वा.चे सुमारास तिचा प्रियकर नामे-बालाजी धाकतोडे रा.मुंजाबावस्ती, धानोरी रोड,पुणे याचा फोन आलेने तो काम करीत असलेले हेअर सलून दुकानांवर भेटणेकामी गेलेली होती ती परत घरी आली नसलेचे समजले.

यातील नमुद महिलेचा प्रियकर बालाजी वैजनाथ धाकतोडे रा.मुंजाबावस्ती, धानोरी रोड याचे घरी जावुन तपास करता तो सुध्दा दि.१०/०५/२०१८ रोजीचे पासुन हेअर सलूनचे दुकानांवर कामांस गेलेनंतर पुन्हा घरी आला नसलेचे व त्याने त्याचे पत्नीस रात्रौ उशिरा फोनद्वारे संपर्क करुन माझे हातून मोठे लफड झालेले आहे तु ताबडतोब सर्व सामान गुंडाळून आपले गावी निघुन जा असे सांगितले असलेचे समजले त्यामुळे बालाजी वैजनाथ धाकतोडे हा प्रथमदर्शनी वरील नमूद गुन्हयांतील मयताचे घातपातांस कारणीभूत असावा असा त्याचेवर संशय बळावला. त्याचेबाबत व त्याचे पुणे शहर व त्याबाहेरील नातेवाईकांबाबत अधिक माहिती काढुन तपास करुन त्यांस त्याचे उपलब्ध फोटोचे आधारे लातूर रेल्वे स्टेशन परिसरांत शोध घेतला असतां तो पुन्हा काळेपडळ,हडपसर,पुणे येथे त्यांचे नातेवाईकांस भेटणेकामी गेलेला असलेची माहिती मिळालेंने आज दि.१४/०५/२०१८ रोजी पहाटे गुन्हयांतील संशयित इसम नामेः-बालाजी ऊर्फ गुरुजी वैजनाथ धाकतोडे, वय २७ वर्षे,धंदा-हेअर कटींग सध्या रा.श्री. बांबळे यांचे घरी भाडयाने, गणपती मंदिराजवळ, मुंजाबा वस्ती, विश्रांतवाडी,पुणे-१५ व मूळगाव-आदर्श कॉलनी,योगेश्वरी कॅन्टीन जवळ, मु.पो.व ता.आंबेजोगाई जि.बीड यांस काळेपडळ,हडपसर,पुणे येथून ताब्यांत घेवून त्याचेकडे गुन्हयांबाबत व गुन्हयांतील मयतांबाबत कौशल्यपुर्ण असा तपास करतां त्यांने सदरची मयत ही त्याची प्रेयसी आयोध्या सुदाम वैद्य वय-२५ वर्षे ही असून तिचे व त्याचे गेले दिड ते दोन वर्षापासून प्रेमसंबंध व अनैतिक शारीरीक संबंध होते. गेले ०३ महिन्यापांसून ती मला तु माझेशी लग्न कर व तुझ्यां बायकोस घटस्फोट दे नाही तर मी तुझा संसार उध्दवस्त करुन टाकेन व तुझे घरी व कामांवर येवून तमाशा करेन अशी वारंवार धमकी देवून त्रांस देत होती म्हणून मित्र नामेः-आंडया ऊर्फ अनिकेत सुनिल खंडागळे रा.सिध्दार्थनगर, लोहगांव,पुणे यांस मदतीला घेवून प्रेयसी आयोध्या वैद्य हिचा काटा काढणेकामी पेट्रोल विकत घेवून तिस फोंन करुन भेटणेकामी बोलावुन तिस वापरते काळे रंगाचे ॲक्टीवा गाडी नं.एमएच१२/पीएम-४४३७ हिचेवरुन मी,मित्र व प्रियेसी असे ट्रिपलसिट पाटील वस्ती, लोहंगाव येथील मोकळे जागेत जावून तेथे तिस दारु पाजलेनंतर तिचेसोबत पुन्हा वाद झालेने सोबत आणलेले चाकूने तिला भोकसून जिवे ठार मारुन व आणलेले पेट्रोलचे आधारे मी स्वतः व मित्र अनिकेत खंडागळे असे आम्ही दोघांनी तिची मयत बॉडी जाळून टाकून तेथून पळ काढलेला होता अशाप्रकारे गुन्हयाची कबुली दिलेली आहे.

वरील गुन्हयांत संपूर्णपणे जळालेल्यां मयत बॉडीची ओळख पटविणेकामी केवळ हातांवरील गोंदणांवरुन हाच धागा असतांना त्याचा आधार घेवून सातत्यपुर्ण व कौशल्यपुर्वक युनिट-५ गुन्हे शाखा,पुणे शहर कडील अधिकारी व कर्मचारी यांनी मयताची ओळख पटवून देवून तिचा अनैतिक संबंधातून खून करुन जाळून टाकणारे नराधमांस जेरबंद करणेची मोलाची कामगिरी केलेली असून त्यांस पुढील कारवाईकामी विमानतळ पोलीस स्टेशनचे ताब्यांत दिलेले आहे.

सदरची कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे, पुणे शहर श्री.प्रदीप देशपांडे, मा.पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, पुणे शहर श्री. पंकज डहाणे, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-२ पुणे शहर, श्री. भानुप्रताप बर्गे यांचे मार्गदर्शनांखाली युनिट-५ चे प्रभारी अधिकारी, श्री.दत्ता चव्हाण,सपो.निरी,युवराज नांद्रे,सपोफौज.लक्ष्मण शिंदे, पो.हवा.संतोष मोहिते,प्रदीप सुर्वे,प्रविण शिंदे,राजेश रणसिंग,माणिक पवार,केरबा गलांडे,सिध्दराम कोळी, पो.ना.महेश वाघमारे,गणेश बाजारे,प्रविण काळभोर,अमजद पठाण,अंकुश जोगदंडे,प्रमोद घाडगे,महिला कर्मचारी सुनंदा भालेराव,स्नेहल जाधव यांनी ही कामगिरी केलेली आहे.

